MHLA050008382016

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.७६/२०१६ मधील नि.क्र.१०२ खालील आदेश</u>**
**<u>( नजीर ..वि.. अफजल व इतर )</u>**

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम-६ नियम-१७ अन्वये दिलेला आहे. त्याच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत दावा दिवाणी अपिल क्र.१९/२०१७ मधील आदेशाप्रमाणे फेरचौकशीसाठी अपिल न्यायालयाने पाठविला आहे. वादी हा गट क्र.२२० या मौजे चेरा, ता.जळकोट येथील ४०४.८३ चौरस मिटर एवढया क्षेत्राचा नोंदणीकृत खरेदीपत्राने दिनांक ०९/१२/२०११ पासुन मालक आणि कब्जेदार आहे.

**२.** खरेदीपत्र करताना प्रतिवादी अफजल याने खरेदीपत्रात दावा मिळकतीचा क्रमांक नमुद न केल्याने महसुल दप्तरी दावा मिळकत अफजलच्या नावे राहिली व त्याचा गैरफायदा घेऊन दिवाणी अपिल क्र.१९/२०१७ प्रलंबित असताना त्याने दावा मिळकती अन्य इसमांना दिनांक २५/०८/२०२१ रोजी विकल्या. त्यानंतर त्या तीन इसमांनी दावा मिळकत बळीराम धुलशेट्टे याला दिनांक १८/०९/२०२३ रोजी रजिष्टर खरेदीपत्राने विकली. त्यामुळे सदरच्या व्यक्ती या कामी आवश्यक पक्षकार आहेत. यास्तव त्यांना सामील प्रतिवादी करण्यासाठी सदरचा अर्ज देण्यात आलेला आहे. अर्जासोबत नि.क्र.१०३ लगत शपथपत्र सादर करण्यात आले आहे.

**३.** वादीने याकामी आपले म्हणणे सादर केले आणि अर्जातील मजकूर नाकारला. वादीचा दावा मिळकतीशी संबंध नाही. त्यामुळे अर्ज चालविण्याजोगा नाही. सदर अर्ज निर्णीत करण्यापुर्वी दावा मिळकतीच्या मालकांना नोटीस काढावी असे त्यात नमुद करण्यात आले.

**४.** वादीतर्फे विधीज्ञ श्री.उप्पे व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.एल.घोगरे यांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** मुळ दावा हा मौजे चेरा, ता.जळकोट येथील ग्रामपंचायत भुखंड क्र.६९५ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी वादीस हरकत अडथळा करु नये या कारणासाठी दाखल केलेला आहे. त्या दाव्यास कारण दिनांक १३/०८/२०१३ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्याविरुध्द घडले असे वादींचे कथन आहे.

**६.** प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी नि.क्र.२० लगत कैफियत आणि प्रतिदावा दाखल करुन वादींविरुध्द मनाई हुकूम मागितला. सदर दाव्याचा निकाल दिनांक ०५/०४/२०१७ रोजी होऊन वादीचा दावा नामंजुर तर प्रतिदावा मंजुर झाला आणि प्रतिवादी हे मौजे चेरा येथील गट क्र.२२० मधील ८२ आर क्षेत्रफळाचे मालक घोषीत करण्यात आले आणि वादीच्या

लाभातील खरेदीपत्र क्र.१२५६/२०११ रद्दबातल घोषीत करण्यात आले. तसेच, प्रतिवादीच्या लाभात कायम मनाईचा आदेशही करण्यात आला.

७. त्याविरुध्द दिवाणी अपिल क्र.१९/२०१७ मध्ये मा.जिल्हा न्यायालय, अहमदपूर यांनी संपरिक्षा न्यायालयाने पक्षकारांना पुरावा देण्याची योग्य संधी न दिल्याचे कारण नमुद करुन सदर दाव्याचा हुकूमनामा रद्दबातल केला आणि दिनांक १८/०३/२०१७ रोजी नव्याने काढलेल्या मुद्यांवर पुरावा देण्याची संधी पक्षकारांना देण्याबाबत दिनांक १३/०५/२०२४ रोजी आदेशीत केले. सदर अपिल दिनांक ०८/०६/२०१७ रोजी दाखल झाले होते.

८. सदर अपिल दाखल केले त्याकामी अपिल न्यायालयाने हुकूमनाम्यास तहकुबी दिली होती किंवा कसे याबद्दल वादीने आपल्या अर्जात नमुद केलेले नाही. याकामी मुळ दावा हा फक्त निरंतर ताकिदीचा असल्याने तो विशीष्ट अनुतोष कायदा,१९६३ कलम ३८ प्रमाणे चालविण्यात येईल. प्रतिवादींविरुध्द मागितलेली दाद ही या प्रतिवादींविरुध्द काढलेल्या दिनांक १३/०८/२०१३ रोजीच्या कारणासाठी असल्याने तेच कारण दाव्यात नव्याने सामील करु इच्छीत असलेल्या प्रतिवादींविरुध्द लागु होणार नाही. सदरची दाद ही व्यक्तीगत स्वरुपाची असल्याने ती फक्त प्रतिवादी क्र.१ ते ६ विरुध्द लागू राहिल. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी अपिल कालावधीमध्ये मिळकत तबदील केली असल्याचे वादीचा आक्षेप आहे. सदर आक्षेप हा अपिल सुरु असल्याने तो दाव्याची पुढील पायरी या स्वरुपातील आहे. दावा अंतिमत: निर्णीत झाला नसल्याने सदर प्रतिवादी यांच्याऐवजी त्यांनी खरेदी दिलेल्या व्यक्तीची नावे दाव्यामध्ये येणे गरजेचे आहे. यास्तव अर्ज मंजुर करणे योग्य व संयुक्तिक राहिल. मात्र सदर प्रस्तावीत प्रतिवादींविरुध्द वादीने कोणत्याही सवरुपातील दाद मागितलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी हे प्रस्तावित प्रतिवादी म्हणुन अंतर्भुत असताना त्यांना सामील करण्याचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक : ०२/०१/२०२५.** **( एस.एन.सरडे )**

**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**